दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/२७/२०१९
दि.१५/०४/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.आसले लक्ष्मण (रोहीत) नारायण आसले, ................अपिलार्थी
३०८, लक्ष्मी नारायण अपार्टमेंट, काशीगाव,
काशिमिरा, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०७.

O/C

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.आसले लक्ष्मण (रोहीत) नारायण आसले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२२/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मिरा भाईंदर मनपाने सुरक्षा रक्षकांचा देण्यात आलेल्या ठेका त्या कंपनीचे नाव व पत्ता आणि मनपा सोबत झालेला करारनामा.
२) त्या कंपनीने नियुक्त केलेले एकुण सुरक्षा रक्षक त्यांची नावे, पत्ता, मोबाईल व त्यांचे चारित्र्य पडताळणी दाखले.
३) मंत्रालयातून (कामगार खाते) यांच्याकडून प्राप्त झालेली नोटीफिकेशन (Notification) प्रत.
४) शासनाने (महाराष्ट्र) सुरक्षा मंडळ यांच्याकडून देण्यात आलेली सुट ची प्रत (Exemption Certificate).
५) महाराष्ट्र सुरक्षा मंडळ यांनी १७ ऑक्टोबर २०१७ रोजी दिलेल्या पगारवाढ संदर्भात आदेशाची अंमलबजावणी केली गेली असल्यास त्याची पोच.
६) आपल्या मनपाकडून एकुण सुरक्षा रक्षकांसाठी एकुण किती पगार दर महिना दिला जातो त्याची एकुण रक्कम.
७) आपल्याकडून देण्यात आलेला सुरक्षा रक्षकसाठी ठेका ज्या कंपनीला देण्यात आला आहे त्या कंपनीची Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare) Act 1981 या कायद्यानुसार सुरक्षा कंपनीसाठी लागणाऱ्या बाबीची पुर्तता केलेली सर्व कागदपत्रे मिळावीत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अपेक्षिलेली माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.२८/०२/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

Scanned by CamScanner

**सुनावणीचा तपशिलः-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२०/०३/२०१९ रोजी दुपारी ०३.२० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३४/२०१९ दि.०७/०३/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी अपिलार्थि अर्जदार हे वैयक्तिक कारणास्तव सुनावणीस अनुपस्थित राहणार असलेबाबत दि.१४/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याने सदरची सुनावणी दि.१२/०४/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/४४/२०१९ दि.०४/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु, सदर दिवशी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ कामी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक असल्याकारणाने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.१५/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली असुन अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना सुनावणीस उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/५७/२०१९ दि.११/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना), व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवादः-** माझ्या दि.२२/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार अपेक्षिलेली माहिती देण्यात आलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवादः-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) अपिलार्थी अर्जदार यांनी माहिती अधिकार अर्जात कालावधी नमुद न केल्याने जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अभिलेखात जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती अपिलार्थी अर्जदारास ७ दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

o/c

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned by CamScanner

**प्रति:-**

१) श्री.आसले लक्ष्मण (रोहीत) नारायण आसले,
३०८, लक्ष्मी नारायण अपार्टमेंट, काशीगाव,
काशिमिरा, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

१८/५/१९

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner